<u>संशोधन आराखडा</u>

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

अंतर्गत

पीएच. डी. (शिक्षणशास्त्र) संशोधन आराखडा

संशोधन समस्या विधान

इयत्ता नववी इंग्रजी विषय सुधारित पाठयक्रमाच्या अध्ययन अध्यापनात येणा–या समस्या :चिकित्सक अभ्यास

संशोधक

मोरे मारोती हरि

एम. ए. इंग्रजी ए. एड्. एम. फिल. (शिक्षणशास्त्र)

Email- marotimore123@gmail.com

Contact : 9765732672

मार्गदर्शक

डॉ. टेकाळे एस. एस.

एम. ए. मराठी, एम. फिल. पीएच. डी. (शिक्षणशास्त्र)

प्राचार्य : इंदिरा गांधी अध्यापक महाविद्यालय वसरणी नांदेड.

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

सन ऑक्टोंबर – 2017

1. प्रस्तावना :

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक शिक्षणामध्ये घडून आलेले बदल हे सर्वांच्याच नजरेत भरण्यासारखे होते. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये शिक्षणाचे माध्यम फक्त इंग्रजी होते. मातृभाषेतून शिक्षणाची सुविधा उपलब्ध नव्हती. त्याचप्रमाणे संपूर्ण शिक्षण व्यवस्था ही केवळ विशिष्ट त-हेने विद्यार्थी तयार करण्याची होती. भविष्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांत विकास घडवून येवून विविध क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी विविध क्षेत्रे उपलब्ध झालेली नव्हती. इंग्रजी हा विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवल्यावर विद्यार्थ्यात एक वेगळाच आत्मविश्वास जागृत होतो आणि त्याच्यात स्वतःच्या पायावर उभे राहण्याची उमेद निर्माण होते. इंग्रजी विषयाबद्दलची कुतूहलता दिवसेंदिवस वाढतच आहे, इंग्रजी माध्यमांच्या शाळांतही भर पडत आहे. इंग्रजी भाषेला पं. जवाहरलाल नेहरू यांनी window of the world म्हटले आहे. एक जागतिक स्तरावरील ती एक संपर्क भाषा ठरली आहे.

भारतात देखील इंग्रजी भाषेला अनिवार्य विषय म्हणून स्थान दिले आहे. इंग्रजी भाषेच्या ज्ञानाने प्रभावी संपर्क कौशल्य, संभाषण कौशल्य यात विकास होतो. व भारतीय विद्यार्थ्याला भारताबाहेर आपली गुणवत्ता सिद्ध करण्यास संधी मिळते.

व्हॉवेल यांच्या मते,

भारतात ब्रिटीश काळात सर्वप्रथम शिक्षणाची अवहेलना केली, नंतर अत्यंत उग्रतेने आणि सफलतेने विरोध केला गेला. त्याच वेळी एका अशा प्रणालीचा सुत्रपात केला गेला की, जो सार्वजनिक पद्धतीने हानीकारक होता. शेवटी त्याला वर्तमान स्थिती प्रदान केली गेली.

संशोधन समस्येची गरज –

इंग्रजी हा विषय दिवसेंदिवस भारतीयांमध्ये रूढ होत चाललेला आहे. भारतीय विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्याच्या हेतूने शासन विविध उपक्रम राबविण्याच्या प्रयत्नात असते आणि याचा बराच फायदा होताना दिसतो तरी पण अनेक विद्यार्थी मागे असल्याचेही दिसून येते. याचे कारण शोधले तर यामध्ये असे दिसून येते कि, मुळात इंग्रजी विषयच अनेक मुलांना अवघड जातो. या विषयाची शिकवणी मातृभाषेतून केली जाते म्हणजे हा विषय केवळ भाषांतरीत करून शिकवला जातो. भाषाशास्त्रांच्या पद्धतीचा वापर यात केल्याचे फारसे दिसून येत नाही. अनेक शिक्षकांमध्ये उपक्रमशीलतेचा अभाव दिसतो, अनेक विद्यार्थी हा विषय अनिवार्य असून पर्यायी विषयासारखा समजतात म्हणजे हा विषय केवळ करायचा म्हणून पूर्ण करतात. अशा अनेक समस्या इंग्रजी विषयाच्या अध्ययन व अध्यापनात दिसून येतात. जुन 2017 पासून इयत्ता 7 वी व 9 वी चा संपूर्ण विषयाचा अभ्यासक्रम व परीक्षा पद्धतीमध्ये बराच बदल शालेय अभ्यासमंडळाने केलेला आहे त्यात अनेक चांगल्या घटकांचा समावेशही केला आहे तरी सुद्धा विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाबद्दलच्या उदासिनतेमुळे या विषयातील त्यांची रूची कमी दिसते.या अभ्यासक्रमामध्ये कृतींवर जास्त भर दिलेला आहे.

मातृभाषेतुन शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांचे इंग्रजी कसे सुधारेल? हा प्रश्न संशोधकाला भेडसावत होता. त्यातून शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांची इंग्रजी बद्दलची निराशा पहाता आणि दर वर्षी दहावीच्या इंग्रजीच्या निकालावर दृष्टिक्षेप टाकला असता इतर विषयापेक्षा इंग्रजी विषयाचा निकाल कमी लागलेला आढळून येतो.

इंग्रजी भाषा विषयाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात असलेली भीती पाहता इंग्रजी विषय विद्यार्थ्यांना अवघड का जातो या गोष्टीचा एकदा शोध ध्यावा असे संशोधकास वाटले व अशा संशोधनाची गरज निर्माण झाली,

संशोधन समस्येचे महत्त्व

माध्यमिक स्तरावर इंग्रजी भाषा ही तृतीय भाषा म्हणून विद्यार्थ्यी अध्ययन करत असतात. इंग्रजी भाषा ही अनेक विद्यार्थ्यांना अवघड वाटत असते कारण त्यांचा इंग्रजी विषयाचा पाया कच्चा असतो. या वर्गात त्यांचा इंग्रजी विषयाचा पाया पक्का होण्याची गरज असते. इंग्रजी विषयाच्या अनेक समस्या विद्यार्थ्याना भेडसावत असतात त्यामुळे अध्यापकांनादेखील अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

याला कारणीभूत त्यांचा त्यांच्या माध्यमिक स्तरापर्यतची इंग्रजी विषयाची भीती आहे. तसेच इंग्रजी विषयाचे शैक्षणिक साहीत्य उपलब्ध नसते त्यामुळे अध्यापकाला अध्यापन कार्यात अडचणी येतात, त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होतो. ब—याच ठिकाणी दोन — दोन तुकडया एकाच अध्यापकाला सांभाळाव्या लागतात त्यामुळे वर्गनियंत्रणाचा प्रश्न निर्माण होतो. तसेच अतिरिक्त कामाच्या ताणामुळे अध्यापकाचे विषय अध्यापनात समाधान जाणवत नाही. तसेच अनेक अप्रशिक्षित किंवा अर्धवट पात्रतेचे लोक अध्यापन करताना दिसतात. त्यामुळे त्यांना विषयाचा सखोल अभ्यास नसतो व ते त्यामुळे अध्यापनात वातावरण निर्मिती करू शकत नाहीत.

व्याक्तिमत्व घडवणे म्हणजे स्वतःचा विकास साधने होय त्यासाठी लागणारे प्रभावी साधन म्हणजे इंग्रजी संभाषण. शिक्षण व इंग्रजी संभाषण या एकदम दोन टोकाच्या वेगवेगळया बाजू आहेत. व्यक्ती कितीही शिकला तरी त्याला इंग्रजी संभाषण करता येत नसेल तर तो शिक्षित समजला जात नाही ही सध्याची कल्पना झालेली आहे. इंग्रजी संभाषणाने व्यक्तीचे व्यक्तिमत्व प्रभावी होतेच तसेच आपण परकीय भाषा आत्मसात करून त्यावर विजय मिळविला याचा आनंद काही व्दिगुणितच असतो. आज भारतीय व्यक्ती इंग्रजीमध्ये शिक्षण घेवून अमेरिकेत जावून आपले व्यक्तीमत्व घडवतो आणि अमेरिकेतील इंग्रजी बोलणारा भारतात मराठीत चार शब्दही बोलू शकत नाही म्हणजे हा भारतीयांचाच विजय होय.

माध्यमिक स्तर हा पुढील (विज्ञान, कला, वाणिज्य) शिक्षणाच पाया आहे. या स्तरावर विद्यार्थ्याचा इंग्रजी विषयाचा पाया पक्का होईल म्हणून इंग्रजी भाषा अध्यापनाचे महत्त्व माध्यमिक स्तरावर आहे. म्हणून संशोधकाने ही समस्या लक्षात घेवून आपले संशोधन कार्य करणार आहे.

1.2 संशोधन समस्या विधान

इयत्ता नववी इंग्रजी विषय सुधारित पाठयक्रमाच्या अध्ययन व अध्यापनात येणा–या समस्या :चिकित्सक अभ्यास

1.3 संशोधन समस्या विधनातील महत्त्वाच्या पदांच्या परिभाषा :

अ. संशोधनाशी संबंधित महत्त्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या

इयत्ता नववी इंग्रजी विषय सुधारित पाठयक्रमाच्या अध्ययन व अध्यापनात येणा–या समस्या :चिकित्सक अभ्यास

1. इयत्ता नववी

माध्यमिक शिक्षणाची पूर्व पायरी व प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातील दुवा असणारी इयत्ता.

2. इंग्रजी भाषा –

“ माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना शिकविण्यात येणारी तृतीय भाषा म्हणजे इंग्रजी होय ”

“ 1952–53 मुदलीयार आयोगाने माध्यमिक शाळांना दोन भाषांचा परिचय व्हावा असे सांगितले. 1964–66 कोठारी आयोगाने त्रिभाषा समत्र सांगितले त्यात क्षेत्रीय भाषा, राष्ट्भाषा, संपर्क भाषा म्हणून इंग्रजीचा पुरस्कार केला”

3. पाठयक्रम

पाठयक्रमाला इंग्रजी भाषेत`लससंइने हा पर्यायी शब्द आहे ज्याची व्याख्या पुढील प्रमाणे,

Syllabus is an academic document that communicates corse information and defines expectations and responsibilities. It is descriptive (unlike prescriptive or specific curriculum.)

4. अध्ययन

अध्ययन म्हणजे ज्ञान संपादन करण्याची प्रक्रिया होय.

वुडवर्थ यांच्या मते, “ शिक्षण घेणे हि एक विकासाची प्रक्रिया आहे ”

5. अध्यापन –

अध्यापन या शब्दाला इंग्रजी पर्यायी शब्द Teaching हा आहे.

“अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी चेतना, मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रोत्साहन देणे होय” – बर्टन

याठिकाणी संशोधक माध्यमिक स्तरावर तृतीय भाषा शिकविण्यात येणा–या अध्यापन प्रक्रियेचा विचार प्रामुख्याने करणार आहे.

5. समस्या :

प्रत्यक्ष अध्यापन कार्य करताना येणा–या अडीअडचणी अध्यापन पूर्व तयारी भौतिक साधन सुविधा शैक्षणिक साहित्य विद्यार्थी संख्या विद्यार्थ अध्यापनाचे आकलन अशा अनेक विविध बाबीमुळे अध्यापनात अडचणी निर्माण होतात त्याविषयी विचार करणार आहे.

6. चिकित्सक –

शब्दकोषातील अर्थानुसार चिकित्सा म्हणजे योग्य ते पाहाणे ज्यात गुणवत्ता आणि दोष या बद्दल प्रतिपादन करणे हा लक्षणार्थ अंतर्भूत आहे. य. च. मुक्त विद्यापिठ नाशिक

संशोधक चिकित्सेमध्ये इंग्रजी अध्यापन, अध्यापक अध्ययनार्थी त्याचे आकलन त्यांना येणा–या समस्यांचा विचार करणार आहे.

7. अभ्यास –

अभि + आस अभ्यास या संस्कृत शब्दाचा अर्थ भोवती बसून शिकणे. गुरूच्या सानिध्यात राहून अध्ययन करणारी प्राचीन पद्धत. अभ्यासाचा दुसरा एक अर्थ सराव असा ही आहे. म. बा. कुंडले.

विद्यार्थी इंग्रजी भाषेचे ज्ञान ग्रहण करणाच्या प्रक्रियेबद्दल संशोधक विचार करणार आहे.

1 उद्दिष्टये

1. इयत्ता नववीच्या सुधारित पाठयक्रमाचा अभ्यास करणे.
2. इयत्ता नववीच्या सुधारित इंग्रजी विषयाच्या अध्ययन, अध्यापनात येणा–या समस्यांचा अभ्यास करणे.
3. इयत्ता नववीच्या सुधारित इंग्रजी विषयाच्या अध्ययन, अध्यापनात येणा–या समस्यांच्या कारणांचा शोध घेणे.
4. इयत्ता नववीच्या सुधारित इंग्रजी विषयाच्या अध्ययन अध्यापनात येणा–या समस्येला अनुसरून निष्कर्ष काढणे व अवश्यक त्या घटकांना शिफारशी करणे.

1.4 संशोधन समस्येची व्याप्ती

अ. क्षेत्रव्याप्ती

1. प्रस्तुत संशोधन हे नांदेड शहरापुरतेच मर्यादित आहे

ब. नमुना व्याप्ती

प्रस्तुत संशोधन हे नांदेड शहरातील माध्यमिक स्तरावरील अनुदानित शाळांशी संबंधित आहे.

क. कालखंड व्याप्ती

प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2017 ते 2019 कालावधीशी संबंधित आहे.

ड. कार्यव्याप्ती

प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील इंग्रजी अध्यापनामध्ये अध्यापकाला येणा–या समस्येशी संबंधित आहे.

इ. घटक व्याप्ती

प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीशी संबंधित आहे.

ई. निष्कर्ष व्याप्ती

प्रस्तुत संशोधनांती पुढे येणारे निष्कर्ष हे इयत्ता नववीच्या इंग्रजी भाषेचे अध्यापन करणारे शिक्षक व अध्ययनार्थींना उपयोगी पडणारे आहे.

2 संशोधन समस्येच्या मर्यादा

अ. कालमर्यादा

प्रस्तुत संशोधन हे इ. सन 2017 ते 2019 दरम्यानच्या इंग्रजी अध्यापनात येणा–या समस्यांचा आढावा व अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

क्षेत्रमर्यादा

प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील पर्यतच्या जिल्हा परिषद व महानगर पालिका अंतर्गत शाळांशी संबंधित आहे.

नमुना मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तराशी संबंधित आहे.

3 संशोधन समस्येची गृहितके

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या कामी काही गृहितके ठरविण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे सांगता येतील.

- काही शिक्षक इंग्रजी तासिकेत मराठी भाषेचा वापर करतात.
- इंग्रजी विषयाच्या तासिकेत चर्चेव्दारा अध्यापन पद्धतीचा अभाव आहे.
- अनेक विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा कठीण वाटते
- अनेक विद्यार्थ्यी इंगजी विषयाच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात.

4 संबंधित साहित्याचा आढावा.

अध्ययन हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ती एक गतिमान प्रक्रिया आहे त्यामुळे त्यात अनेक समस्या निर्माण होतात या समस्यांचा शैक्षणिक दृष्टया विचार करणे अगत्याचे असते. संशोधनाचा संबंध नेहमीच विकासाशी असतो. त्या दृष्टीकोनातून शालेय स्तरावर इतर विषयाबरोबरच इंग्रजी विषयही तेवढाच महत्त्वाचा आहे म्हणून संशोधकाने नांदेड शहरातील माध्यमिक स्तरावरील जि.प. शाळा व महानगर पालिका अंतर्गत चालणा–या शाळांमध्ये अध्ययन अध्यापन प्रक्रियेत येणा–या समस्यांचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे आणि या अनुषंगाने तो संबंधित साहीत्याचा अभ्यास करणार आहे.

संशोधनाची कार्यपद्धतीः

कोणतेही कार्य करताना त्या कार्यासाठी अगोदर नियोजन करणे गरजेचे असते. प्रभावशाली नियोजनानेच योग्य निष्कर्ष मिळतात. आणि प्रभावशाली नियोजनासाठी निश्चित अभ्यासपद्धती आणि त्याला अनुसरून साधनांची निवड करावी लागते. संशोधक त्याच्या संशोधन कार्यात पुढील संशोधन पद्धती व त्यासाठी लागणा–या साधनांची निवड करणार आहे

संशोधन पद्धतीः

संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्याचे ठरविले आहे. सर्वेक्षण पद्धतीला संशोधनात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. यामध्ये वर्तमान काळावर जास्त भर असतो, सद्यस्थितीचे वर्णन यामध्ये असते तसेच यामध्ये केवळ वर्णनात्मक किंवा पत्रके तयार करणे एवढेच नाही तर संकलित माहितीचे मापन, वर्गीकरण, अर्थनिर्वचन आणि मूल्यांकन यांच्याआधारे वर्णित विषयाचे स्पष्टीकरण, तुलना व सार्थकता इ. असते. सर्वेक्षणातून पुढील तीन प्रकारची माहीती संकलित केली जाते.

अ. वर्तमान स्थिती   ब. अपेक्षित स्थिती   क. अवश्यक साधनांचा बोध

प्रस्तुत सव्हेक्षणात विद्यालय सव्हेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाची साधने :

प्रश्नावली :

संशोधक त्याच्या सर्वेक्षण पद्धतीत प्रश्नावलीचा उपयोग करणार आहेत. प्रश्नावली म्हणजे प्रश्नांचे व्यवस्थित केलेले संकलन, ते प्रतिसादकास दिले जातात व त्यावर त्यांच्या प्रतिक्रिया घेतल्या जातात. त्याचे वर्गीकरण केले जाते व त्यांचा संख्याशास्त्रीय पद्धतीने विचार केला जातो. तसेच प्रश्नावलीमध्ये संशोधन विषयाच्या संबंधित संख्यात्मक व गुणात्मक अशी दोन्ही प्रकारची माहिती मिळते.

प्रश्नावली तयार करणे हे खुप वेळ लागणारे,अत्यंत काळजीपूर्वक व मेहनत लागणारे कार्य आहे. ती लांबलचक व दोषपूर्ण नसावी याची काळजी संशोधकाला घ्यावी लागते. प्रश्नावली बिनचूक व आकर्षक असावी तसेच प्रतिसादक त्याला दुर्लक्षित करणार नाही याची काळजी संशोधकाला घ्यावी लागते.

हि प्रश्नावली विद्यार्थी व शिक्षक मुख्याध्यापक, विषयतज्ञ व्दिपर्यायी प्रश्नावली यांच्यासाठी वापरण्यात येणार आहे.

न्यादर्श निवड :

जनसंख्येच्या तथ्याविषयी पूर्वानुमान करण्याकरिता जनसंख्येतुन निवडलेल्या व्यक्ती किंवा वस्तू यांच्या लहान गटास न्यादर्श म्हणतात. संशोधन प्रक्रियेत संपूर्ण जनसंख्येचा समावेश करणे शक्य नसतो त्यासाठी एकूण जनसंख्येच्या प्रमाणात उपसंच निवडावा लागतो.

माध्यमिक स्तरावर इंग्रजी अध्यपनाध्ये अध्यापकाला येणा—या समस्यांचा अभ्यास हा भौगोलिकदृष्टया नांदेड शहरापुरता मर्यादित आहे. यामध्ये संशोधकाने नांदेड शहरात येणा—या जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व महानगरपालिका अंतर्गत येणा—या माध्यमिक शाळा याचा विचार केलेला आहे. नांदेड शहरात येणा—या या एकूण शाळांची माहिती घेवून त्यातून न्यादर्श म्हणून काही शाळांची निवड संशोधक करणार आहे.

माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन :

संकलित केलेल्या माहितीचे अर्थनिर्वचन करणे अत्यावश्यक असते. जोपर्यत त्याचे निर्वचन योग्य व अचूक होणार नाही तोपर्यंत माहितीचे संकलन करून काही उपयोग होणार नाही. संशोधकाने निवडलेल्या शाळांतून प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहीतीच्या आधारे संख्यात्मक व गुणात्मक वर्गीकरण करून संशोधक त्या माहीतीचे गरजेनूसार तक्यामध्ये किंवा आलेखामध्ये सविस्तर माहीतीसह अर्थनिर्वचन करणार आहे.

निष्कर्ष व शिफारशी :

संशोधकाने संकलीक केलेल्या माहितीचे संख्यात्मक व गुणात्मक वर्गीकरण केल्यावर त्यातून निधणा—या निष्कर्षाचे वर्गीकरण करून त्या योग्य त्या घटकांना शिफारशी करण्यात येणार आहेत.

पुढील संशोधनासाठी विषय :

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना संशोधकावर काळ आणि आर्थिक व इतर काही मर्यादा जाणवत असतात त्यामुळे संशोधकाला अनेक समस्या जाणवतात त्यातून संशोधन करताना नव्याने समस्या निर्माण होतात त्या शीर्षकरूपाने शेवटी मांडण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ :

प्रस्तुत विषयाची निवड केल्यावर संशोधकाला आवश्यक त्या संदर्भ ग्रंथांची, संगणकीय संकेतस्थळांची, शैक्षणिक मासिके, इ. तसेच संशोधनासाठी अवश्यक त्या संदर्भांचा संशोधक वापर करणार आहे.